27 DEC 2017
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोव्यावर शिवाजी विद्यापीठाची मात

## हृषिकेश मेथे-पाटीलचे गोल : अखिल भारतीय विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भोपाळ (मध्यप्रदेश) येथील जागरण लेक सिटी विद्यापीठ येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ पुरुष फुटबॉल संघाने गोवा विद्यापीठाचा २-० असा पराभव केला. त्यामुळे सलग दुसऱ्या वर्षी हा संघ अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.





भोपाळ येथे झालेल्या स्पर्धेत विजय मिळवून अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या संघासोबत प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे, प्रा. अमर सासने उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ व गोवा विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यांत शिवाजी विद्यापीठ संघाने २-० ने मात केली. यात पूर्वार्धापर्यंत दोन्ही संघांकडून आक्रमक व वेगवान चाली रचत आघाडी घेण्याचा प्रयत्न झाला; पण त्यांना यश आले नाही.उत्तरार्धात 'शिवाजी विद्यापीठ'कडून ६० व्या मिनिटास हृषिकेश मेथे-पाटीलने संघाचा व वैयक्तिक पहिला गोल नोंदविला. ७० व्या मिनिटाला पुन्हा श्रीधर परबच्या पासवर दुसऱ्या गोलची नोंद केली. सामन्यात शिवाजी विद्यापीठाकडून राहुल पाटील, वृषभ ढेरे, कर्णधार सुमित घाडगे यांनी उत्कृष्ट चाली रचल्या. या संघाला डॉ. अभिजित वणिरे, प्रा. अमर सासने यांचे मार्गदर्शन लाभले. अन्य सामन्यांत मुंबई विद्यापीठाने बरकत उल्लाह विद्यापीठ (भोपाळ)चा ४-०ने, तर जागरण लेक सिटी विद्यापीठाने अमरावती विद्यापीठाचा २-१ने पराभव केला. एस. एन. यू. पी. ई. - ग्वाल्हेर संघाने होळकर विद्यापीठ (इंदोर)चा पराभव केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2017
तरुण भारत



अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विद्यापीठाच्या संघासोबत प्रशिक्षक प्रा. डॉ. अभिजित वणिरे व प्रा. अमर सासने.

# शिवाजी विद्यापीठ संघ अ. भा. विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

भोपाळ (मध्यप्रदेश) येथे पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेतील पात्रता सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने गोवा विद्यापीठ संघावर २-० गोलने विजय मिळवला. निर्णायक दोन गोल नोंदविणारा हृषिकेश मेथे-पाटील हा शिवाजी विद्यापीठासाठी महत्वपूर्ण ठरलेल्या सामन्याचा हिरो ठरला. तसेच सामन्यातील विजयामुळे शिवाजी विद्यापीठचा संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला.

शिवाजी विद्यापीठाबरोबरच महाराष्ट्रातील मुंबई विद्यापीठ, जागरण लेक सिटी विद्यापीठ (भोपाळ), लक्ष्मीबाई नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ग्वाल्हेर (ग्वाल्हेर) आदी संघही या स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. ही स्पर्धा कालिकत विद्यापीठाच्या (केरळ) मैदानावर ३१ डिसेंबर ते ५ जानेवारी दरम्यान होणार आहे.

गतवर्षी मिदनापुरमध्ये (पश्चिम बंगाल) झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघ खेळला होता. त्यामुळे विद्यापीठाच्या संघाला भोपाळमध्ये सध्या सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेतील केवळ पात्रता सामना खेळण्याची संधी मिळाली होती. सामन्याचा पुर्वार्ध गोल शुन्यबरोबरीत राहिला असला तरी उत्तरार्धात मात्र सामन्याच्या ६० व्या मिनिटाला मिळालेल्या संधीवर हृषिकेशने गोवा संघावर पहिला आणि ७० व्या मिनिटाला श्रीधरने दिलेल्या पासवर हृषिकेशनेच दुसरा गोल करुन विद्यापीठाला आघाडी मिळवून दिली. अखेर याच आघाडीच्या जोरावर विद्यापीठ संघाने हा सामना २-० असा जिंकला.

**पश्चिम विभागीय स्पर्धेत गोवा संघाचा २ गोलने केला पराभव**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2017
पुढारी

# जयसिंगपूर येथे आंतरमहाविद्यालयीन संशोधन स्पर्धा

**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :** येथे डॉ.जे.जे.मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय 'आविष्कार २०१७-१८' या आंतरमहाविद्यालयीन संशोधन स्पर्धेचे आयोजन २८ डिसेंबरला करण्यात आल्याची माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांनी दिली. स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष विजय मगदूम, उपाध्यक्षा ॲड.सौ.सोनाली मगदूम यांचे मार्गदर्शन व प्रेरणा लाभत आहे. ते पुढे म्हणाले, स्पर्धेमध्ये विद्यार्थी संशोधक आपले संशोधन, पोस्टर्स व मॉडेल्सची मांडणी करू शकतात. यामध्ये मानव्यशास्त्र व भाषा, वाणिज्य व्यवस्थापन कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषध निर्माण शास्त्र या विषयांतर्गत शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात येईल. या कार्यक्रमासाठी सायन्स इंजिनिअरिंग विभागाचे डिन डॉ. पी. एस.पाटील, अकाऊंटट मॅनेजर डॉ. रमेश पुदाले, आ. सुजित मिणचेकर, समन्वय कौशल्य व उद्योजकता विकास शिवाजी विद्यापीठचे डॉ.ए.एम.गुरव यांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार आहे. स्पर्धेचे संयोजन करण्यासाठी प्राचार्य डॉ. सावंत, प्रा.सौ.एस. आर. महाडिक व प्रा. व्ही. जे. खोत यांनी नियोजन केले आहे.

2 7 DEC 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मोबाईल ॲपमुळे प्रश्नपत्रिका होतील इतिहासजमा

## मनुष्यबळ विकास मंत्रालय उत्सुक : अब्जावधींचा वाचेल खर्च, पर्यावरणाची हानीही टळेल

**कोल्हापूर : सुरेश सुतार**

देशभरात सध्या प्राथमिक ते महाविद्यालयातील सर्व परीक्षांसाठी कागदावर छापलेल्या प्रश्नपत्रिकांचाच वापर केला जातो. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून असलेली ही परीक्षा घेण्याची पद्धत बदलू शकते. भविष्यात प्रश्नपत्रिका तुमच्या मोबाईलमध्येच उपलब्ध होईल. मात्र, ही प्रश्नपत्रिका हार्ड नव्हे, तर सॉफ्टकॉपीमध्ये असेल. यामुळे भविष्यात छापील प्रश्नपत्रिका इतिहासजमा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रश्नपत्रिका छपाईसाठी दरवर्षी देशभरात मोठ्या प्रमाणात कागद तसेच अब्जावधी रुपये खर्च होतात. मात्र, एका मोबाईल ॲपमुळे कागद व पैशांचा अपव्यय वाचणार आहे. नोएडास्थित एमजीएम कॉलेजने एक ऑनलाईन क्वेश्चन डिस्ट्रिब्युशन ॲप (ॲप्लिकेशन) विकसित केले आहे. उल्लेखनीय म्हणजे एमजीएम कॉलेजच्या या प्रकल्पात मनुष्यबळ विकास मंत्रालयानेही उत्सुकता दर्शविली आहे.

### मनुष्यबळ विकास मंत्रालयाला पसंत पडले ॲप

ॲपसंबंधीचा हा प्रोजेक्ट प्रथम सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयाला सोपवण्यात आला. या मंत्रालयाने मनुष्यबळ विकास मंत्रालयाला दाखवला. हा प्रोजेक्ट इतका पसंत पडला की सरकारने यामध्ये फंडिंग करण्यास उत्सुकता दर्शविली आहे. यासंदर्भात एमजीएम कॉलेजचे प्रा. डॉ. वाघ यांनी सांगितले की, जूनमध्ये चार विद्यार्थ्यांना घेऊन आम्ही काम सुरु केले. आता ॲप तयार झाले असून त्याची चाचणीही यशस्वी ठरली आहे.

सध्याच्या परीक्षा पद्धतीच्या नियमानुसार विद्यार्थी आपला मोबाईल परीक्षेवेळी जवळ बाळगू शकत नाहीत. हा नियम विद्यार्थ्यांना कॉपी करण्यापासून रोखण्यासाठी आहे. मात्र, नव्या ॲपमुळे विद्यार्थी मोबाईल घेऊन परीक्षेला येतील. कारण, प्रश्नपत्रिका केवळ मोबाईलवरच उपलब्ध होतील.

ऑनलाईन क्वेश्चन डिस्ट्रिब्युशन ॲपचा वापर अत्यंत कुशल पद्धतीने होणार आहे. प्रथम परीक्षार्थींच्या मोबाईलवर एक वेबलिंक पाठवून त्या मोबाईलला सेंट्रल सर्व्हरशी कनेक्ट करण्यात येईल. विद्यार्थी परीक्षा हॉलमध्ये पोहोचल्यानंतर त्याच्या मोबाईलवर एक कोड पाठवला जाईल. या कोडला सर्व्हरच्या वेब लिंकमध्ये टाकताच, मोबाईल सर्व्हरशी कनेक्ट होईल. या सर्व्हरच्या मदतीने हा ॲप परीक्षार्थींच्या मोबाईलवर ॲक्टिव्ह होईल. एकदा का हा ॲप ॲक्टिव्ह झाला की मोबाईलमधील उर्वरित सर्व सुविधा आपोआप ब्लॉक होतील. परीक्षार्थीच्या मोबाईल स्क्रीनवर केवळ प्रश्नपत्रिकाच दिसेल. म्हणजेच कॉलिंग, मॅसेजिंग, इंटरनेट सर्फिंग यासारख्या सुविधा पूर्णपणे आपोआप ब्लॉक झालेल्या असतील. पेपर संपल्यानंतर त्या कार्यरत होतील.



मोबाईल स्क्रीनवरील प्रश्नपत्रिका पाहून परीक्षार्थींना उपलब्ध करून देण्यात आलेल्या उत्तरपत्रिकेवर प्रश्न सोडवावे लागतील. पेपरचा निर्धारित कालावधी संपताच परीक्षार्थींचा मोबाईल सर्व्हरशी आपोआप डिसकनेक्ट होईल. प्रश्नपत्रिका मात्र मोबाईलमध्ये आपोआप सेव्ह झालेली असेल.

### अब्जावधी रुपये वाचतील

प्रश्नपत्रिका छपाईवर दरवर्षी देशभरात अब्जावधी रुपये खर्च होतात. याशिवाय यासाठी लागणारा कागद तयार करण्यासाठी शेकडो झाडे तोडली जातात. यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. मात्र, भविष्यात ऑनलाईन क्वेश्चन डिस्ट्रिब्युशन ॲपचा वापर झाल्यास अब्जावधी रुपयांचा खर्च वाचेलच, शिवाय पर्यावरणाची हानीही टळेल.